# महाराष्ट्राच्या राजकारणावर प्रदेशवादाचा प्रभाव

डॉ. शरद सांबारे
(राज्यशास्त्र विभागप्रमुख)
यशोदा गर्ल्स आॅर्ट ॲण्ड कॉमर्स कॉलेज
नागपूर

**प्रस्तावना :**

भारत हा लोकशाहीप्रधान देश असून धार्मिक विविधता हे या देशाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. भारतातील ही विविधता आणि समाजव्यवस्था लक्षात घेवून संविधानकारांनी संविधान निर्माण करण्याचे कार्य केले. भारतीय संविधानाने संघराज्य व्यवस्था स्वीकारली असली तरी या विविधतेने तिला प्रभावित केले आहे. त्यामुळे भाषावार प्रांतरचना करणे संविधानकारांना भाग पडले. भारतीय संघातील घटक राज्याच्या प्रादेशिक वैशिष्ट्यांच्या आधारे काटेकोरपणे राज्याची निर्मिती न झाल्यामुळे भाषिक, धार्मिक, सांस्कृतिक आणि आर्थिक असमतोल यातून प्रदेशवाद जोपासण्याची प्रवृत्ती अनेक भागात निर्माण झाली. राष्ट्रीय दुर्बलता निर्माण करणारा एक दुदैवी घटक म्हणजे प्रदेशवाद होय. या प्रदेशवादामुळे केंद्र व घटक सरकाराच्या संबंधावर विपरीत परिणाम होत असतो. भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेच्या मार्गातील मोठा अडथळा म्हणजे प्रदेशवाद होय.

अस्मितेला जेव्हा अनावश्यक महत्त्व दिल्या जाते तेव्हा त्याचे रूपांतर प्रदेशवादात होत असते. आपल्या देशापेक्षा देशाच्या विशिष्ट भागावर प्रेम करणे, देशहितापेक्षा विशिष्ट भागाचेच हित पाहणे याला प्रदेशवाद म्हणता येईल. परंतु निरनिराळ्य प्रदेशातील स्थानिक समस्यामुळे निरनिराळ्य प्रदेशातील लोकांना स्थानिकतेची भावना निर्माण होते ही प्रवृत्ती पुढे वाढत जाऊन आपल्या प्रदेशाला आणि तिथल्या प्रश्नांना प्राधान्य देण्याचे प्रमाण वाढत जाते. याचा फायदा काही राजकीय पक्ष उचलतात. प्रदेशवादाच्या आधारावर अनेक राज्यातून प्रादेशिक पक्ष अस्तित्वात आले. त्यांनी आपल्या प्रदेशातील समस्यांना अग्रक्रम दिल्यामुळे लोकमताचे समर्थन अशा पक्षांना मोठ्य प्रमाणावर मिळू लागले. याचा परिणाम असा झाला की, राष्ट्रीय पक्षाचे महत्त्व कमी होऊन प्रादेशिक पक्षांना महत्त्व आले. उदा. महाराष्ट्रामध्ये शिवसेना, महाराष्ट्र नवनिर्माण सेना इ. मेघालय, नागालैण्ड, मणिपूर, मिझोरम, त्रिपुरा, अरुणाचल प्रदेश ही राज्ये आसामच्या डोंगरी प्रदेशातील जनतेची प्रादेशिक निष्ठा वेळोवेळी प्रगट झाल्यामुळे निर्माण करावी लागली. या डोंगरी प्रदेशातील लोकांची प्रादेशिक निष्ठा जबरदस्त होती. त्यामुळे केंद्र सरकारला त्यांना स्वतंत्र घटक राज्याच्या दर्जा देणे भाग पडले. महाराष्ट्रातील विदर्भ भागावर अन्याय झाला आहे या समजुतीने महाविदर्भ संघर्ष समिती अधूनमधून आंदोलन करताना दिसते. आंध्रात तेलंगणावाद्यांची प्रदेश निष्ठा जागृत झालेली असून स्वतंत्र तेलंगणाची मागणी होत आहे व ती २९ वे घटक राज्य म्हणून पूर्णत्वास आली. पंजाबची खलिस्तान राज्याची मागणी पुन्हा केव्हा डोके वर काढेल सांगता येत नाही.

गुजरातमध्ये सौराष्ट्र असा संघर्ष चालू आहे. मध्य प्रदेशात महाकोशल, भोपाळ हे

स्वतंत्र राज्याची मागणी करीत आहे. राजस्थान, पूर्व राजस्थान व पश्चिम राजस्थान असा प्रादेशिक संघर्ष सुरू आहे. अलीकडेच उत्तरांचल, झारखंड व छत्तीसगड अशी स्वतंत्र राज्याची निर्मिती झाली आहे. दार्जिलिंगच्या डोंगरी प्रदेश पश्चिम बंगालमधून स्वायत्त होण्याची भाषा बोलत आहे. अशा प्रकारे बहुसंख्य राज्यातील प्रदेशवादाची भावना प्रकट झालेली दिसते.

भारतातील सर्व घटक राज्याची आर्थिक परिस्थिती आणि आर्थिक विकासाचा दर सारखा नाही. नैसर्गिक पर्यावरण, साधन सामुगी, दळणवळणाच्या सोयी, रोजगार, शिक्षण, औद्योगिकीकरण, शेतकी विकास इत्यादी बाबतीत प्रत्येक राज्यातील परिस्थिती दुसऱ्या राज्यापेक्षा अधिक भिन्न आहे. काही राज्ये आर्थिकदृष्ट्या अधिक प्रगत किंवा प्रगतिपथावर आहेत तर अनेक राज्य अजूनही मागासलेलीच आहे. महाराष्ट्राच्या वेगळ्या प्रदेशात आर्थिक विषमता आहे. मराठवाडा, कोकण व विदर्भ हे विकासाच्या दृष्टीने मागासलेले आहेत. मोठ्या राज्यात त्यांच्या विकासाकडे दुर्लक्ष होणार नाही याची हमी देता येत नाही. म्हणून विदर्भाच्या स्वतंत्र राज्यासाठी आज आंदोलने होताना दिसतात.

एका बाजूला महाराष्ट्रात लोकांचे वर्चस्व असले पाहिजे. तेथील नोकरवर्गात अधिकाधिक महाराष्ट्रीयन लोक असावे. येथील व्यापार उद्यमावर महाराष्ट्रीयन लोकांचे वर्चस्व असावे. यासारख्या प्रादेशिक मागण्या पुढे करून सुरू झालेले राजकीय पक्षाचे आंदोलन तर दुसऱ्या बाजूला महाराष्ट्रातूनच विकासाच्या नावावर स्वतंत्र राज्याची लढत चाललेली मागणी तसेच भाषिक आधारावर परप्रांतीयाबद्दलचा आकस, वंश, धर्म, संस्कृती यांच्यातील भिन्नता इत्यादी कारणामुळे प्रदेशवाद महाराष्ट्राच्या राजकारणाला प्रभावित करत आहे. या प्रदेशवादाची कारणमीमांसा जाणून घेणे व मुख्यत: १९९५ नंतरच्या कालखंडात त्याने महाराष्ट्रीय लोकांचे हित जोपासण्यात दिलेले योगदान व निर्माण केलेल्या समस्यांचे अध्ययन करणे त्या दृष्टीने या विषयाची निवड संशोधनाचा एक विषय म्हणून प्रस्तुत संशोधनकर्त्याने केली आहे. भारतीय संघराज्याच्या .निर्मितीनंतर प्रादेशिक अस्मितांचे प्रश्न टोकदार बनू लागले. भारतीय रचनाकारांना प्रांतीयता, भाषावाद यांच्या पलीकडे जावून एकात्मक अशा संघीय शासनाचा ढाचा निर्माण करावयाचा होता. भारतीय संविधानातील घटना कलम १ या अनुषंगाने रचनाकारांना अभिप्रेत असा दृष्टिकोन व्यक्क्त करताना दिसतो. ब्रिटिश कालखंडात जो प्रश्न प्रादेशिक स्वरूपाच्या अनुषंगातून तीव्र अशी टोकदार नव्हती. तसेच प्रजासत्ताक भारतीय रचना असावी असे जवाहरलाल नेहरूंना पंतप्रधान म्हणून वाटायचे. परंतु १९५३ मध्ये मद्रास प्रांतात तेलगू भाषिकांच्या आंदोलनाचे उचल खाली पोट्टू श्रीरामलूच्या प्राणांतिक ७४ दिवसाच्या आत्मत्यागानंतर तेलगू भाषिक आणि तामिळ यांच्यातील संघर्ष परकोटीच्या वादाचा ठरला. यातूनच फजल अली कमिशन आयोगाची निर्मिती झाली. १९५६ मध्ये भारत सरकारला सादर केलेल्या अहवालानुसार भाषिक आधारावर राज्य निर्मिती व्हावी हा तोडगा देण्यात आला. १९६० पर्यंत भाषांच्या आधारावर भारतीय संघराज्यात १४ घटक राज्ये अस्तित्वात आली.

भारतीय संघराज्याच्या निर्मितीमागचा उद्देश संविधानिकदृष्ट्या प्रशासनाची सोय या अनुषंगातून आहे. १९५३ नंतर मात्र प्रशासकीय सोय डावलून परिस्थितीजन्य सोयीचे निर्णय हा नवा संदर्भ उदयास आला. परिणामी भारतीय संघराज्याची मूळ संकल्पना पासष्ट वर्षामध्ये सातत्याने बदललेली दिसून येते. १९७१ च्या कालखंडात निर्माण करण्यात आलेले सिक्कीम

VOL- VII ISSUE- XII DECEMBER 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

राज्य चीनच्या विस्तार नितीला दिलेले उत्तर होते. तर व्यापक अशा आसाम राज्याची विभागणी करून नव्या सहा राज्याची करण्यात आलेली निर्मिती वांशिक संघर्षाला विराम देण्याचा दृष्टीने उचलण्यात आलेले पाऊल होते. २००० मध्ये नव्याने निर्माण करण्यात आलेली उत्तराखंड, झारखंड आणि छत्तीसगड प्रशासकीय सोयीच्या अनुषंगाने व्यक्त करण्यात आली असली तरी त्यातील अंतर्गत हेतू मात्र सूक्ष्म राजकीय स्वरूपाचा होता. झारखंड व छत्तीसगड आदिवासींच्या विभक्तीकरणाचा आदिवासी राजकीय नेतृत्व मर्यादित करण्याचा व उद्योग साम्राज्याला आदिवासींच्या क्षेत्रीय जगात आपले साम्राज्य उभे करण्याचा दिलेला परवाना आहे. असमतोल असणारा विकास ज्यावेळी भयावह बनतो त्यावेळी तेलंगणासारखी राज्य निर्माण करते ही राजकीय गरज बनते. मुळातूनच प्रादेशिक प्रश्न ही राजकीय आणि सामाजिक संघर्षाची परिणीती होय. ब्रिटिशांच्या गुलामीतून मुक्तता मिळविण्याकरिता अतिशय एकात्म पद्धतीने लढलेला लढा प्रजासत्ताक भारतात मात्र दुभंगू लागला आहे. याची कारणे भारताच्या सामाजिक दुराव्यामध्ये दिसून येते. सुप्रसिद्ध समाजशास्त्री टी.के. ओनम यांच्या मते, ''भारतातील सामाजिक व्यवस्था केवळ जातरचनेनी पोखरलेली नसून ती अंतर्गत संस्कृती, भाषा, इतिहास, परंपरा, पोटजाती, धर्म रचना, पंथाचे वेगवेगळे मठालये यामुळे अधिकान्ये दुभंगल्या गेली आहे.'' प्रदेशवादाची नवीन आव्हाने वरवर पाहता राजकीय स्वरूपाची आणि आर्थिक असमतोलाची वाटत असली तरी त्यामागे अर्थ रचनांचा मुद्दा सर्वाधिक प्रभावी आहे. नव्वदी कालखंडात उदयास आलेल्या राजकीय प्रश्नांना आर्थिक पाठबळ मिळाल्याशिवाय स्थिरस्थावर होता येत नसल्याचे दिसून येते. त्यामुळे तात्त्विक वा वैचारिक अधिष्ठांना हा मुद्दा या ठिकाणी गैर लागू पडतो. सक्षम असे आर्थिक आणि मध्यम पाठबळ ही सर्वच राजकीय पक्षांची गरज बनली आहे. नव्वद नंतरच्या कालखंडातील प्रकर्षाने जाणविणारी एक बाब म्हणजे माध्यम राजकीय प्रभावातून मुक्त झालेले असून आता मात्र राजकीय पक्षच माध्यमाच्या प्रवाहाच्या गर्तेत सापडलीत. माध्यम आता प्रश्नाचे क्रम ठरवू लागले आहेत आणि त्या क्रमांना नाकारणे राजकीय वर्गांना सोपे नाही. परिणामी मूळ प्रश्नांना बगल देऊन माध्यम प्रश्नांची चर्चा प्रकाशझोतात राहत आहे. राज्याच्या एखाद्या भागावर अन्याय झाला अथवा नाही हे माध्यम जोपर्यंत पटवून देणार नाही तोपर्यंत प्रश्नांची तीव्रता नगण्य राहील हे नवे स्वरूप प्रादेशिकतेच्या आणि राजकीय संदर्भात सर्वाधिक वेदनादायी आहे. परिणामत: संघीय ठाच्याच्याच प्रणालीमध्ये मूलभूत परिवर्तन आणण्यास कारणीभूत ठरत असताना दिसून येतो.

**निष्कर्ष :**

भारताच्या राष्ट्र बांधणीतील तसेच राष्ट्रीय एकात्मतेतील अडसरमधील एक भाग प्रदेशवाद हा आहे. तो आर्थिक, भाषिक, जातीय, सांस्कृतिक, धामिक, भौगोलिक असा कोणताही असू शकतो. याच आधारावर भारतामध्ये अनेक राज्याच्या मागण्या जोर धरत आहे. बुंदेल खंडाची मागणी, गोरखालॅण्ड तसेच महाराष्ट्रामध्ये विदर्भाची मागणी तितकीच जुनी आहे. भाषावार प्रांतरचना झाली तरी आपल्या प्रादेशिक अस्मितेच्या जाणिवेतून ती जाणीव कोणतीही असो प्रदेशवादाची भावना वाढीस लागत आहे.

**संदर्भ :**


१) कुलकर्णी, सुहासे., व पळशीकार, सुहास. (२००६). महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष. पुणे: समकालीन प्रकाशन

२) कुलकर्णी, श्री. म., साठे, सुश्री., व कडू, मोहिनी. (२००५). भारतीय

राजकारण – दशा आणि दिशा. नागपूर: विजय प्रकाशन

३) पळशीकर, सुहास. (२००९). भारताचे प्रादेशिक पक्षाचे अंतरंग. पुणे: श्री प्रतिमा प्रकाश

४) भोळे, भा. ल. (२००३). भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण. नागपूर: पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स

५) सराटे, बाळासाहेब. (२००९). राजकीय पर्याय. परभणी: रेणुका प्रकाशन

६) Bhattacharyya, H. (2005). Federation and Regionalism.

7) Majumdar, A. K., & Sing, Bhanwar. (1999). Regionalism in Indian Politics. Delhi: Radha Prakshan

8) Sing, B., & Majumdar, A. (1999). Region Politics and Society. Delhi : Raj Books

9) Thakur, Ramesh. (1995). Government and Politics of India. Delhi: Palgrave Macmillan